लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

विवाहविषयक
सातारा, सांगली, कोल्हापूर मधील मागासवर्गीय वधूसाठी मोफत नाव नोंदणी व परित्यक्ता, विधवा महिलांसाठी नाव नोंदणी चालू आहे.
संपर्क : ८६८९९३४९९६

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ८४ वा | रविवार, दि. २० ऑक्टोबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# ज्यांनी आपल्याला संपवलं त्यांना संपविण्यातही आपला विजय, जरांगे पाटलांचा मराठा समाजाला 'मेसेज'

**जालना (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाज हा राजकारण करण्यासाठी एकत्र आलेला नव्हता. आपण आरक्षणासाठी समाज म्हणून एकत्र आलो होतो. परंतु देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याला नाईलाजाने या रस्त्यावर जायला लावले आहे.

त्यांनी आरक्षणाचा घास आपल्या तोंडून हिरावला आहे, असा आरोप करून ज्यांनी आपल्याला संपवलं त्यांना संपविण्यातही आपला विजय आहे, अशी उघड भूमिका मराठा आरक्षण आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील यांनी घेतली.



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत आपले उमेदवार उभे करायचे की सत्ताधाऱ्यांना पाडायचे? यावर मंथन करण्यासाठी जरांगे पाटील यांनी समाजाची बैठक बोलावली होती. आजच्या बैठकीत काही निर्णय झाला नाही. परंतु उमेदवार उभे केले पाहिजे की उमेदवार उभे न करता सत्ताधाऱ्यांच्या विरोधात काम केले पाहिजे? यावर चर्चा झाल्याचे जरांगे यांनी सांगितले.

**देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याला निवडणुकीच्या रस्त्यावर आणले**

रविवारी राज्यातील समाज एकत्र येत विधानसभेविषयी चर्चा करणार असून दिवसभर मॅरेथॉन बैठका संपन्न होतील. उद्याचा निर्णय हा निर्णायक आहे आणि यावेळी घाई गडबड असायला नको. उद्या निर्णय चुकायला नको, या निर्णयामुळे समाज अडचणीत येता कामा नये. समाज हा राजकारण करण्यासाठी एक आला नव्हता, आम्ही समाज म्हणून केवळ आरक्षणाकरिता एकत्र आलो होतो. परंतु देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याला नाईलाजाने या रस्त्यावर जायला लावले आहे, असे जरांगे म्हणाले.

**ज्यांनी समाजाची फसगत केली, त्यांना संपविणे गरजेचे**

समाजाची फसगत झाली नाही पाहिजे, आणि आपल्याला जे संपवायला निघाले आहेत, त्यांना संपवणे गरजेचे आहे. ज्यांनी आपल्याला संपवले त्यांना संपवण्यात देखील विजय असतो. समाज संपवायचा ज्यांनी विडा उचलला आहे तर त्यांनाही संपविणे आपले काम आहे. याला त्याला निवडून आणण्यापेक्षा आपल्या मुलांच्या भविष्यावर कोण गंडांतर आणतंय तोच संपला पाहिजे, हे समाज म्हणून आपले कर्तव्य आहे, असे जरांगे पाटील म्हणाले. निवडणुकीत उभे राहूनच विजय मिळवता येतो, असे काही नसते. निवडणुकीत उभे राहूनच विजय मिळवता येतो, असे काही नसते. आपल्याविषयी जो वाईट विचार करतो, आपल्या समाजविषयी द्वेष आहे, त्याला हरवणे सुद्धा विजय असतो. मला दिसत आहे, सर्व तज्ज्ञ, वकील, राजकीय अभ्यासक या सर्वांचे मत एकच होते, असेही जरांगे पाटील यांनी सांगितले.

## थोरल्या पवारांनी पुन्हा डाव टाकला; रणजितसिंह मोहिते पाटलांच्या हाती तुतारी, आमदारकीचा दिला राजीनामा

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** नुकतीच विधानसभा निवडणुकीची घोषणा झाली असून महायुतीत जागा वाटप सुरु आहे. अशात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे संस्थापक खासदार शरद पवार यांनी पुन्हा एकदा मोठा डाव टाकला आहे.

विधान परिषद सदस्य रणजितसिंह मोहिते पाटील यांनी आपल्या आमदारकी आणि भाजप पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला असून ते आजच सायंकाळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणार आहेत. विधानसभेच्या तोंडावर अनेक नेते पक्षांतर करत असून राजकीय पक्षांना मोठे खिंडार पडत आहे. अशातच आता भाजपला हर्षवर्धन पाटील यांच्यानंतर मोहिते पाटलांच्या राजीनाम्याची पुन्हा पश्चिम महाराष्ट्रात मोठा धक्का बसला आहे.

रणजितसिंह मोहिते पाटील हे भाजपचे विधानपरिषदेचे आमदार असून रणजितसिंह यांना उमेदवारी मिळावी यासाठी





धैर्यशील मोहिते पाटील यांनी शरद पवारांची काही दिवसापूर्वी भेट घेतली होती. यावेळी पवारांच्या भेटीसाठी रणजितसिंह मोहिते पाटील देखील आले होते, पण माध्यमांच्या भीतीमुळे ते भेट न घेताच निघून गेले. मात्र, आज त्यांनी आपल्या आमदारकीचा आणि भाजपच्या सदस्यत्वाचा राजीनामा भाजपाकडे पाठविला.

**थोरल्या पवारांकडून भाजपला धक्क्यांवर धक्के**

लोकसभा निवडणुकीतील निर्भेळ यशानंतर शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्यासाठी रांगा लागल्या आहेत. कागलमध्ये समरजीतसिंह घाटगे यांनी तुतारी हाती घेतल्यानंतर बारामतीच्या शेजारील इंदापुरमध्येही हर्षवर्धन पाटील यांनी भाजपला दणका देऊन राष्ट्रवादीत प्रवेश केला. दोन नेत्यांच्या पक्षप्रवेशाला आठवडा उलटत नाही तोच बारामतीशेजारील फलटणमध्ये रामराजे नाईक निंबाळकर यांचे बंधू आणि अजित पवार गटाचे आमदार दीपक चव्हाण यांनीही तुतारी फुंकली. आता माढ्यातही रणजितसिंह मोहिते पाटील विधानसभा लढण्यासाठी इच्छुक असून त्यांनी भाजपच्या सदस्यत्वाचा आणि आमदारकीचा राजीनामा पक्षश्रेष्ठींकडे पाठवला आहे. आज रात्रीच शरदचंद्र पवार पक्षात मोहिते पाटील प्रवेश करणार आहेत.

**लोकसभा निवडणुकीत मोहिते पाटील घराण्याने निर्णय बदलला**

लोकसभा निवडणुकीत मोहिते पाटील घराण्याने आपला निर्णय बदलला. त्यानंतर त्यांनाही पुन्हा शरद पवार यांच्या पक्षाकडे जाण्याचा निर्णय घेतला. ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील आणि पुतणे धैर्यशील मोहिते पाटील यांनी लोकसभेपूर्वी राष्ट्रवादीत प्रवेश केला. शरद पवार यांनी धैर्यशील मोहिते पाटील यांना लोकसभेची उमेदवारी दिली आणि निवडूनही आणले. वडील आणि चुलत भावाचा अधिकृत पक्षप्रवेश झाला परंतु स्वतः रणजितसिंह यांनी अधिकृत राष्ट्रवादीत प्रवेश घेण्याचे टाळले. अगदी धैर्यशील मोहिते पाटील यांची लोकसभा प्रचारयंत्रणा रणजितसिंह यांनीच सांभाळली होती.

## रंगभूमी म्हणजे कलेचे अभयारण्य, प्रयोगशाळा- सुव्रत जोशी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रंगभूमी म्हणजे कलेचे अभयारण्य आहे. कलेची प्रयोगशाळा आहे. नाटक म्हणजे मोठ्या माणसांची भातुकली असते, असे मत अभिनेता सुव्रत जोशी यांनी व्यक्त केले. प्रिसिजन फाउंडेशन तर्फे आयोजित प्रिसिजन गप्पा कार्यक्रमात घेतलेल्या मुलाखतीत ते बोलत होते.

प्रारंभी प्रिसीजन फाउंडेशनतर्फे आयोजित प्रिसीजन गप्पा कार्यक्रमाच्या १६ व्या पवार्चे उद्घाटन सतीश आळेकर यतिन शहा, डॉ सुहासिनी शहा, रवींद्र जोशी, अनुपम बर्वे, सुरत जोशी गिरीजा यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी अतिशय संवाद या नाटकाचा प्रयोग प्रिसिजन फाउंडेशन तर्फे प्रेक्षकांसाठी ठेवण्यात आला होता . प्रेक्षकांनीही या नाटकाला चांगली दाद दिली.

यावेळी सुव्रत जोशी यांनी रंगभूमी व नाटकाबद्दल बोलताना, रसिक नाटक चांगले ऐकत बघत असतात त्यावेळी शब्दांचे नवे अर्थ



आम्हालाही समजतात. सतीश सरांची नाटकांविषयी व्याख्या वेगळी आहे. नाटक म्हणजे मोठ्या माणसांची भातुकली असते असे सांगितले.

अभिनेत्री गिरिजा ओक यांनी सध्या आयडॉलॉजीपेक्षा जास्त सध्याच्या वातावरणात स्वतःचे मत मांडण्याची अथवा भूमिका घेण्याचा अधिकार राहिलेला नाही. नाटक या माध्यमावर खूप प्रेम आहे. मी आळेकर सरांची नाटके बघत मोठी झाले. त्यांना नाही म्हणणे मूर्खपणाचे ठरले असते म्हणून हे नाटक केल्याचे सांगितले.

नाटकाचे लेखक सतीश आळेकर यांनी नाटकाबद्दल बोलताना परिस्थितीतील बदलांना उजाळा दिला. राजकीय संस्कृती १९९० नंतर बदलायला लागली. त्यांनतर आताच्या परिस्थितीकडे वयाच्या ७५ व्या वर्षी नाटक लिहून झाल्याचा आनंद आहे. दिल्ली येथे आयआयसी येथे फिरताना करगोट्याबद्दल विचार आला.

करगोट्याबद्दल लिहिताना घरातील वातावरण राजकीय पार्श्वभूमी होती. त्यानंतर सगळं बदलत गेले. राजकारणातील उदार मतवादपणा आधीचा सध्या राहिलेला नाही, अशी खंत व्यक्त केली. नाटक लिहणे म्हणजे भानावर राहून स्पेस रंगवण्यासारखे आहे. लेखक म्हणजे तो रंगवणारा व शब्दप्रसंग कालवणारा आहे. असे आळेकर सर म्हणाले.

मनात जे साचत ते मी कागदावर उतरवतो. ते आवडलेच पाहिजे असा माझा कधीही आग्रह नाही, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन माधव देशपांडे यांनी केले.

## परिचारक समर्थकांनी पुन्हा घेतली शरद पवारांची भेट

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** भारतीय जनता पक्षाचे माजी आमदार प्रशांत परिचारक समर्थक नेत्यांनी पुन्हा एकदा ज्येष्ठ नेते शरद पवार यांची मुंबईत जाऊन भेट घेतली. दामाजी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष शिवानंद पाटील यांच्यासह परिचारक समर्थक संचालकांबरोबरच मंगळवेढ्यातील समविचारी आघाडीचे नेतेही या शिष्टमंडळात होते.

यातील समविचारी नेत्यांनी माजी आमदार प्रशांत परिचारक किंवा भगीरथ भालके या दौघांपकी कोणालाही उमेदवारी द्यावी, अशी मागणी केली. त्यावर पवारांनी दोन दिवसांत सर्व्हे करून पंढरपूरचा राष्ट्रवादीचा उमेदवार जाहीर करण्यात येईल, असे सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा पंढरपूर-मंगळवेढ्याचा उमेदवार कोण असणार, याची उत्सुकता मतदारसंघात लागून राहिली आहे. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष भगीरथ भालके यांनी पुन्हा एकदा शरद पवार यांची भेट घेत उमेदवारीची मागणी केली आहे. पण, पवारांकडून अजूनही भालकेंना उमेदवारीचा सिग्नल मिळालेला नाही.

दुसरीकडे, माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करावा, यासाठी समर्थकांचा त्यांच्यावर दबाव वाढत आहे. तुतारीच्या चिन्हावर परिचारक यांनी पंढरपूरमधून निवडणूक लढवावी, अशी मागणी जोर धरत आहे. बार्शीच्या दौऱ्यावर आल्यानंतरही परिचारक समर्थकांनी शरद पवार यांची भेट घेतली होती.




पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील समविचारी आघाडीच्या शिष्टमंडळाने पुन्हा शरद पवारांची भेट घेतली. त्या दामाजी कारखान्याचे अध्यक्ष शिवानंद पाटील, अजित जगताप, युन्नस शेख, गौरीशंकर बुरकुल, राजेंद्र पाटील, गौडप्पा बिराजदार, महादेव लुगडे, दिगंबर भाकरे, औदुंबर वाडदेकर, प्रवीण खवतोडे, विजय बुरकुल आदी उपस्थित होते.

शरद पवारांच्या राष्ट्रवादीतही विजयदादांना मानाचे पान.शरद पवारांनी दामाजी कारखान्याचे अध्यक्ष शिवानंद पाटील यांच्याकडून गतवर्षी दामाजीचे गाळप किती टन झाले, उसाला दर काय दिला, दामाजीचा साखर उतारा व साखर पोती किती उत्पादित झाली, याबाबत माहिती घेतली. अडचणीच्या काळात दामाजी कारखाना चांगला चालवल्याबद्दलही पवारांनी कौतुक केले. दामाजी कारखाना सुरू करण्यासाठी आपण (स्व.) कि. रा. मर्दा, (स्व.) रतनचंद शहा आणि (स्व.) चरणूकाका पाटील यांच्या माध्यमातून सहकार्य केल्याची आठवण त्यांनी या वेळी सांगितली.

समविचारी आघाडीतील नेत्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार लवकर निश्चित करावा. माजी आमदार प्रशांत परिचारक किंवा भगीरथ भालके या दोघांपैकी कुणालाही संधी द्यावी पण त्याबाबतचा निर्णय लवकर जाहीर करावा, अशी मागणी केली. त्यावर शरद पवारांनी पंढरपूर मतदारसंघात पक्षांतर्गत सर्व्हे सुरू आहे. त्या सव्हेर्तून ज्या नावाची पसंती येईल, त्यानंतर दोन दिवसांत पंढरपूरचा उमेदवार निश्चित करण्यात येईल, असे यावेळी दिले सध्या पवारांनी सांगितले.शरद पवारांचा भाजपला पुन्हा धक्का; फडणवीसांचा विश्वासू नेता तुतारी हाती घेणार

राष्ट्रवादी काँग्रेसच्या तुतारीवर निवडणूक लढवण्यासाठी जवळपास डझनभर इच्छुकांनी इच्छा व्यक्त केली आहे. भैरवनाथ शुगरचे उपाध्यक्ष अनिल सावंत, भगीरथ भालके यांनी उमेदवारीसाठी मुलाखत दिली आहे. याशिवाय प्रशांत परिचारक यांनी तुतारीची उमेदवारी घ्यावी, अशी आग्रही मागणी त्यांच्या समर्थकांकडून केली जात आहे. अशा परिस्थितीत या तिघांपैकी कुणाला संधी मिळते, याची उत्सुकता मतदारसंघात शिगेला पोचली आहे.

PRECISION FOUNDATION
'प्रिसिजन फाऊंडेशन', आयोजित...
प्रिसीजन गप्पा पर्व १६ वे
रविवार दि. २० ऑक्टोबर २०२४
पारंपारिक अभंगांना नव्या पिढीच्या नव्या भाषेत अर्थात फ्यूजन संगीताचा आधुनिक वाद्यसंगीताचा साज देत सादर होणारा भन्नाट कार्यक्रम




'अभंग रिपोस्ट'
▪ प्रतिश मस्के - गायन आणि ध्वनिक गिटार
▪ अजय वाव्हाळ - इलेक्ट्रीक गिटार
▪ पियुष आचार्य - हार्मोनियम
▪ विराज आचार्य - तबला आणि तालवाद्य
▪ दुष्यंत देवरूखकर - ड्रम्स
▪ स्वप्निल तर्फे - बेस गिटार
Soham Ads
वेळ : सायं. ६.२५ वा. । स्थळ : शिवछत्रपती रंगभवन, सोलापूर

## ना.पाटील व आ. यशवंत मानें यांचा मतदारांच्या गाटीभेटीवर भर

**उत्तर सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नामदार राजन पाटील यांनी काही महिन्यांपूर्वीच आ.यशवंत माने यांची उमेदवार जाहीर करून विरोधकांची तोंड बंद केली होती.

मोहोळ विधान सभा मतदारसंघ हा ना.राजन पाटील यांचा बालेकिल्ला समजला जातोय. या मतदारसंघात राजन पाटील व राजन पाटील विरोधक असे दोनच पक्ष कार्यरत आहेत असे म्हटले तर अतिशयोक्त होणार नाही. यशवंत माने यांच्या विरोधात लढविण्यासाठी विरोधकांना अजूनही उमेदवार मिळाला नाही. तोपर्यंत यशवंत माने यांनी आपल्या मतदारसंघात गावभेट दौऱ्याच्या माध्यमातून प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे.

उत्तर सोलापूर तालुक्यातील भोगाव,बाणेगाव येथे आ. यशवंत (तात्या) माने यांनी गावभेट दौऱ्या दरम्यान नागरिकांशी संवाद साधला.





यावेळी प्रकाश चोरेकर, सुनील भोसले, प्रविण भालशंकर, दाजी गोफणे, मंजूर शेख, शिरीष म्हमाने, जगन्नाथ भोरे, अमोल पाटील,दशरथ पवार, जिल्हा कार्याध्यक्ष उज्वला पाटील, भोगाव सरपंच सुनील भोसले,उपसरपंच गोरख भोसले

ग्रामपंचायत सदस्य महादेव वाघमारे, माजी सरपंच गोपाळ मसलखांब सोमवंशी तसेच बानेगावचे उपसरपंच सुयोग जालिंदर कांबळे,ग्रामपंचायत सदस्य सुदाम भाऊ होनकोंबडे, सुशांत कांबळे चंद्रकांत तोडकरी ज्ञानेश्वर कोळी विकास वाघमारे किरण रुपनर आकाश मोरे रोहित बोराडे समाधान शिंदे साईनाथ चव्हाण शुभम चौरे दयानंद गायकवाड संदीप चव्हाण शुभम बरबडे महावीर कोळी दुरण कोळी सुशांत कांबळे, अशोक पवार, लखन वाघमारे, विनोद हंकारे, योगेश माळी सह इतर उपस्थित होते.

तर मार्डी, येथे महाराष्ट्र राज्य रोजगार हमी मंडळाचे अध्यक्ष श्री शहाजी भाऊ (पान 2 वर..)

पाहिजेत
दैनिक सोलापूर कटूसत्य
सोलापूर वृत्तदर्पण न्यूज चॅनल

सोलापूर वृत्तदर्पण व दैनिक कटूसत्य या माध्यमांच्या वतीने एक अभिनव व अनोखी योजना राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजना यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | व्यवस्थापक | २ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १५००० ते २०००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| २) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १०००० ते १५००० रुपये | असल्यास प्राधान्य |
| ३) | सह संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ४) | उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ५) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ८) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ९) | प्रशिक्षण अधिकारी | १ | एम. बी.ए. / पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| १०) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |

नियम व अटी :- १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरून, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्त्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ४५ वर्षापर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करु शकतो. ३) सर्व अधिकार वृत्तदर्पण कडे राखीव राहतील आणि ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. वृत्तदर्पण चा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेऊनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वाहन असणाऱ्यास प्राधान्य.

फोन : 0217-2605091 मो.9657069069
संपर्क :- वृत्तदर्पण कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, चेतन फौन्ड्रीसमोर, होटगी रोड, सोलापूर-३.

## संपादकीय

# शरीफांची शराफत

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाज शरीफ भारताबद्दल पुन्हा चांगले बोलले आहेत. शरीफ मुळात उद्योजक आणि राजकारणी आहेत. उद्योजकांना व्यवहार कळतो, नफा-तोटा समजतो. तो शरीफ यांना चांगला समजत असल्यामुळे त्यांना भारताशी तणाव तेवढासा मान्य नसतो कारण त्यात अंतिमतः पाकिस्तानचाच तोटा असल्याचे त्यांचे मानणे आहे.

त्यांच्या अथवा पाकिस्तानच्या दुर्दैवाने पाकिस्तानात लष्कराच्या बळावर बेटकुळ्या फुगवून सत्तेवर आलेल्या राजकारण्यांना ते समजत नाही. कारण लष्कर त्यांना ते समजू देत नाही किंवा त्यांनी ते समजून घ्यावे अशी लष्कराची इच्छा नसते. एरव्ही पाकिस्तानात बहुतांश काळ लष्करी राजवटच होती.

आपण किती शक्तीशाली आहोत आणि पाकिस्तानचे कसे भाग्यविधाते आहोत हे वारंवार सिद्ध करण्यासाठी तेथील लष्करशहांनी भारतविरोधी चादरच सतत अंथरली. त्यातून भारताचे आर्थिक आघाडीवर फारसे नुकसान झाले नाही. तथापि, पाकिस्तानला त्याचा जबर फटका बसला आणि आजही बसतो आहे. त्यातून हा देश चीन या खुनशी देशाच्या कच्छपी लागला. पाकिस्तानात झालेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या परिषदेला अर्थात एससीओच्या बैठकीसाठी भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर पाकिस्तानला जाऊन आले. नवाज शरीफ आता पाकिस्तानचे पंतप्रधान नाहीत, मात्र विद्यमान राजवटीवर शरीफ यांचा प्रभाव आहे.

त्यांचे धाकटे बंधू शाहबाज हे पाकिस्तानचे पंतप्रधान आहेत आणि ते आघाडीचे सरकार चालवत आहेत. या पार्श्वभूमीवर नवाज यांनी काही विधान केले, तर ते भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांसाठी महत्त्वाचे असते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानात यायला हवे होते अशी टिप्पणी नवाज यांनी केली आहे. मागे मोदी यांनी अचानक कशी त्यांच्या कुटुंबाला भेट दिली होती याचीही आठवण त्यांनी करून दिली. जयशंकर यांच्या भेटीचे त्यांनी मनापासून स्वागत केले तसेच भारत आणि पाकिस्तानमधील बिघडत्या संबंधांसाठी माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्यावर टीका केली. पंतप्रधान मोदी यांच्या विरोधात इम्रान यांनी अनेक वेळा अनावश्यक टिप्पण्या केल्या.

त्यामुळे कटुता निर्माण होत गेली. दोन्ही देशांनी परस्परांच्या नेत्यांबाबत अशा शब्दांचा उपयोग करणे तर दूरच, असा विचारही करायला नको, असे नवाज यांनी सांगितले. भारत आणि पाकिस्तानला जोडणारा क्रिकेट हा दुवा आहे. क्रिकेट आणि व्यापारही पुन्हा सुरू झाला पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. जयशंकर यांच्या भेटीमुळे नवाज विशेष उत्साही झाल्याचे दिसले. यामुळे दोन्ही देशांतील बर्फ वितळण्यास सुरुवात होईल अशी भावना त्यांनी व्यक्त केली. नवाज शरीफ कोणी पत्रकार अथवा दोन्ही देशांतील राजकारणाचे विश्लेषक नाहीत. ते एक जबाबदार नेते आहेत आणि त्यांनी पाकिस्तानची धुरा तीन वेळा सांभाळली आहे. त्यामुळे विश्लेषकांपेक्षा त्यांना जास्त समजते, असे मानण्यास हरकत नाही. कारगिलच्या युद्धाच्या वेळीही तेच पाकिस्तानचे पंतप्रधान होते. तेव्हाच्या लष्करी नेतृत्वाने त्यांनाही अंधारात ठेवत भारतात घुसखोरी करण्याचे साहस केले असे म्हटले जाते. स्वतः शरीफ यांनीही हा गौप्यस्फोट केला आहे. त्यानंतर पाकिस्तानला कसा मार खावा लागला आणि भारताला रोखण्यासाठी अमेरिकेची कशी मनधरणी करावी लागली आदी बाबी मध्यंतरीच्या काळात समोर आल्या आहेत. तथापि, एक मात्र खरे की उद्योजक नवाज शरीफ यांना नफा तोटा समजत असल्यामुळे त्यांनी पाकिस्तानच्या लष्कराप्रमाणे अथवा लष्कराच्या प्याद्यांप्रमाणे उठवळ स्वरूपाचे राजकारण केले नाही.

गेली 70 वर्षे आपली परस्परांशी लढण्यात गेली. पुढची सत्तर वर्षे आपल्याला अशीच घालवायची आहेत का, असा शरीफ यांचा सवाल आहे. शरीफ आता मायदेशी परतले आहेत. त्या अगोदर काही वर्षे त्यांना ब्रिटनमध्ये विजनवासात घालवावी लागली. त्यापूर्वी जेव्हा ते पंतप्रधान होते तेव्हाही त्यांनी पाकिस्तानातील कथित युद्धखोरांना वस्तुस्थितीची जाणीव करून देणारे वाक्य ऐकवले होते. आपण आणखी किती काळ आपल्या मुलांच्या ताटातील अन्न काढून घेत तो पैसा शस्त्रे आणि दारूगोळा खरेदी करण्यासाठी खर्च करणार आहोत, असा सवाल त्यांनी तेव्हाही केला होता.

त्यावेळी त्याचीही चर्चा झाली होती, मात्र भारत विरोधावरच ज्यांचे अस्तित्व आहे त्यांना शरीफ यांची ही शांततेची भाषाही संकटाची वाटू लागली होती. शरीफ आता पुन्हा भारतासोबत मैत्रीची आस लावून बसले असले अन् भारत त्यांना मनापासून प्रतिसाद देण्यास सज्ज झाला तरी पाकिस्तान आणि दोन्ही देशांच्या संबंधांत जी भली मोठी दरी निर्माण झाली आहे ती भरून कशी काढणार हा प्रश्नच आहे. भारताला रस्ते, समुद्र आणि आकाश अशा तीनही मार्गांनी घेरण्याचा चीनचा प्रयत्न लपून राहिलेला नाही. त्याकरताच गेल्या दशकभरात चीनने भारताच्या सर्व शेजार्यांना चारा टाकण्यास सुरुवात केली. त्यात पाकिस्तानही होता. चीनने पाकिस्तानात मोठी गुंतवणूक केली आहे.

तथापि, या गुंतवणुकीत जे उभारले जाणार आहे ते चीनला थेट भारत आणि पाकिस्तानच्या सीमेवर आणून उभे करणार आहे. त्यामुळे भारताचा त्याला विरोध आहे. जयशंकर यांनी एससीओच्या बैठकीतील आपल्या भाषणात त्याचाच उल्लेख केला आहे. खुद्द पाकिस्तानातही चीनच्या गुंतवणुकीला आणि चीनला विरोध वाढत चालला आहे. चीनच्या कर्जाच्या विळख्याची दाहकता ज्यांना समजली असे श्रीलंका, बांगलादेश आणि अगदी ताजे उदाहरण म्हणजे मालदीवही त्या देशाच्या पाशातून स्वतःला सोडवून घेण्याचा प्रयत्न करत आहेत व पुन्हा भारतावर विश्वास व्यक्त करताना दिसत आहेत. पाकिस्तानचे तसे नाही. किंबहुना त्या देशाच्या लष्कराने ज्या प्रकारे चीनची सार्वकालीन मित्र अशी संभावना केली आहे तो मोसम बदलेपर्यंत पाकिस्तान भारताकडे पूर्वग्रह विरहित दृष्टीने पाहण्याची सूतराम शक्यता नाही. नवाज शरीफ यांची शराफत चांगली आहे, मात्र पाकिस्तानात सगळेच 'शरीफ' नाहीत.

## प्रबोधन

# भारतः प्रगत की अप्रगत ?

जगात आज अंदाजे ५०० कोटी जिवंत माणसं आहेत, त्यापैकी ४७५ कोटीहून अधिक लोक ईश्वर मानणारे आहेत. ह्याचा अर्थ, फार फार तर पाच-दहा टक्के लोकच काय ते ईश्वर न मानणारे असतील. आणखी बारीक विचार केल्यास मागासलेल्या राष्ट्रांतील आणि विकसनशील राष्ट्रांतील प्रजेमध्ये ईश्वरवादी संख्येने अधिक आढळतील. विकसित राष्ट्रांत ईश्वर मानणारे आहेत, पण ते ईश्वरावलंबी नाहीत. इंग्लंड-अमेरिकेत चर्चेस आहेत, पण इथे जसे रोज मंदिर-मशिदीत जाणारे आहेत, तसा प्रकार तेथे आढळत नाही. म्हणूनच ईश्वरवाद्यांचेही दोन प्रकार केले पाहिजेत. एक पूर्ण ईश्वरावलंबी आणि दुसरे निमित्तमात्र ईश्वरवादी, पण स्वावलंबी ! यावरूनच राष्ट्रांचे तीन प्रकार करता येतील. जी राष्ट्र देव, भुतं, पितर मानतात ती अत्यंत मागासलेली; जी राष्ट्र देव मानतात, पण तो तात्त्विक पातळीवर- ती विकसनशील; आणि जी राष्ट्र देव मानूनही बुद्धिप्रामाण्यवाद, विज्ञाननिष्ठा यांचीही जोपासना करतात ती विकसित, असं वर्गीकरण ईश्वरप्रामाण्यवादी पातळीवरून केलं पाहिजे. मागासलेल्या आणि विकसनशील राष्ट्रांचा एक गट, तर विकसित राष्ट्रांचा दुसरा गट. पहिला गट ईश्वरावलंबी, तर दुसरा स्वावलंबी. ईश्वरावलंबी राष्ट्रांची प्रगती का होत नाही, याचं कारण त्यांचं ईश्वरावलंबी असणं हेच आहे.

भारत हा द्विधा अवस्था भोगणारा देश असल्याचं थोडं चिकित्सापूर्वक पाहिल्यास समजेल. आपण धड ऐहिकवादीही नाही आणि आपणास धर्मनिष्ठ परमार्थवादी होणंही परवडणारं नाही. भारत हा धर्मनिष्ठांचा देश नाही, असं ठाम मत स्वामी विवेकानंदांनी व्यक्त केलं आहे. ते म्हणतात, 'खूप विचाराअंती अखेर माझं मत झालं आहे की, जे लोक या देशात आज ह्यधर्म-धर्म' करून आरडाओरडा करतात, त्यांच्यातील बरेचसे विकृत, डोक्याचे हलके आणि धर्मांध आहेत. आत्यंतिक रजोगुणाची कास धरल्याखेरीज तुम्हाला आता ना इहलोकाची आशा, ना परलोकाची, सारा देश (विकृत धर्मजन्य) तमोगुणाने कुंद होऊन गेला आहे. आणि फलही तसंच मिळत आहे- इहलोकी गुलामी, परलोकी नरक!'

स्वामी विवेकानंदांनी ज्या रजोगुणाचा आग्रह इथे धरला आहे, तो रजोगुणच विकसित राष्ट्रांच्या वर्तनातून दिसून येतो. त्यांनी सत्त्वगुणांचा उल्लेखही धरलेला नाही आणि आग्रह तर मुळीच केलेला नाही. मानवी जीवन आता ज्या वळणावर आलेलं आहे, त्या वळणावरून ऐहिकतेच्या दिशेनेच आपला प्रवास होणं अपरिहार्य झालं आहे. महात्मा होणं वाईट नव्हे, सत्त्वगुण वाईट नाहीत, पण कुटुंबवत्सलता आणि सत्त्वगुणी महात्मेपण यांना एकत्र करणं मूर्खपणाचं ठरेल. संत तुकारामांसारखी सत्त्वगुणी महात्मा मंडळी उसाची मोळी घरी जाता जाता गावातील सर्व मुलांना वाटून रिकाम्या हाताने घरी जातील. पण त्यांच्या घरच्या लोकांना हे कळल्यास त्यांना घरचा आहेर स्वीकारावा लागेल. हे लक्षात ठेवून फार तर १० पैकी ४ ऊस वाटता येतील. अन्यथा बेजबाबदार माणूस असा शिक्का त्याला मिरवावा लागेल. म्हणून व्यवहारवादी, इहवादी, भौतिकवादी वळण समाजाला कसं लागेल? नियतीवाद, दैववाद, भाग्यवाद ही आपल्या मनातून कशी हद्दपार होतील? याचाच विचार प्रामुख्याने झाला पाहिजे. देवाला मनातून हाकलून देणं प्रत्येकालाच प्रभावाखालून सुटका करून घेणं शक्य आहे. पाश्चात्त्यांनी हे प्रयोगाने, व्यवहाराने, आचार-विचाराने सिद्ध केलेलंच आहे. त्यांच्या जीवनाचा-चिंतनाच्या पातळीवरील अभ्यास ईश्वरावलंबित्वाच्या जोखडातून आपणास नक्कीच मुक्त करू शकेल. नाही तरी देव ही कल्पनाच आहे. बरं, देवाला जेमतेमच मानणारे पाश्चात्त्य काही नीती-अनीती मानतच नाहीत, असं नाही. पापभीरू लोक जगात सर्वत्र आहे. त्यांची संख्या तुरळक असेल, पण आहेत. कायद्याचं ज्ञान नसतानाही मागाधरि वर्तणारे जगभर आहेतच. सगळे पाश्चात्त्य खलपुरुष किंवा कलीपुरुष आणि सगळे पौर्वात्य धर्मावतार, सज्जनपुरुष हा विचारही कोताच आहे. देव न मानताही मानवतावादी वर्तन करता येतं. 'देव न मानणारा देवमाणूस,' हे विशेषण आजवर अनेकांना लावलं गेलेलं आहे. आपणाला असं काही व्हायचं असेल, तर लक्षात ठेवा-

प्रगत समाज । म्हणून आपला
देश कोठे आहे। मोजा बरे ॥19
अप्रगत देश । भारता म्हणती
कारणे शोधा ती । त्याची आता ॥ २
प्राचीन संस्कृती । उच्च तत्त्वज्ञान
धर्म, कर्मकांड भारतात ॥३
तरी अप्रगत । देश का राहिला
मागे का पडला । दुनियेच्या ॥४
प्रगतीचा अर्थ । भौतिक प्रगती
अध्यात्माची गती । गतिरोध ॥५
देवाधर्मा नादी । सारेच लागती
खुंटली प्रगती। गेलो मागे ॥६
काय चाटायचे। उच्च तत्त्वज्ञान?
भुकेचे साधन । आधी हवे ॥७
अनंत हाताने । कमलावराने
शिळेपाके सुद्धा । दिले नाही ॥८
जग गेले पुढे। आता तरी उठा
गबाळा तो फेका। करा काम ॥९
काम हाच राम । अन्य तो हराम
भक्ती हा विश्राम। प्रेतांसाठी ॥१०



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

## प्रबोधन

# राष्ट्रजीवन
# राष्ट्रीय एकताचे । स्वप्न का भंगते

राष्ट्रीय एकात्मता हा शब्द जरी स्वातंत्र्य प्राप्तीनंतर प्रचलित झाला असला, तरी तो आधुनिक काळात इ.स. १८८५ला स्थापन झालेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या ध्येय धोरणापासूनच जन्मास आला. काँग्रेसने अखिल भारतीय पातळीवर देशाच्या विविध जाती, धर्म, पंथ, व्यवसायातील प्रतिनिधिक राष्ट्रभक्तांना एकत्र आणलं आणि या प्रक्रियेतूनच राष्ट्रीय एकात्मतेची भावना मूळ धरू लागली. महात्मा गांधीजींनी आजच्या भारत जोडो अभियानापूर्वीच भारतात हम सब एक है ही भावना आपल्या भारतसंचार कार्यक्रमातून दृढमूल केली होती आणि ती आजही सार्वभौम भारतात दिसून येते; म्हणून भारतीय एकात्मतेचं प्रतीक म्हणून महात्मा गांधीजींचं स्मरण करणं आवश्यक आहे. १९३८मध्ये डेलांग येथे भरलेल्या गांधी सेवा संघ संमेलनात प्रांतभावनेला विरोध करून राष्ट्रीय एकात्मतेसाठी कटिबद्ध झालेला हा महात्मा म्हणाला होता, 'आपण प्रांतवाद मिटवला पाहिजे. जर आंध्रवासी म्हणून लागले की, आंध्र आंध्रवासीयांकरिता आहे. उत्कल उत्कलवासीयांकरिता आहे, तर अशाने अधिक प्रांतीयता येत राहील. सत्य हे आहे की, आंध्र आणि उत्कल या दोघांनी देश आणि जगाकरिता आत्मदान केलं पाहिजे. '

छत्रपती शिवाजी महाराजांनी जी राष्ट्रभावना, राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय अस्मिता जागृत केली, ती खरी राष्ट्रीय एकात्मता होती. ती निरोगी होती. जाती-धर्म-पंथ-वर्ग या पलीकडे शुद्ध होती. लॉर्ड वॉरन हेस्टिंग्ज यांनी तिचा शोध लावला त्यांनी लिहिलं, 'हिंदुस्थानातील फक्त मराठ्यांजवळ राष्ट्रीय भक्तीची भावना आहे. आपल्या मुलुखावर हल्ला झाला, तर ते सारं काही विसरून एकत्र येतात आणि प्रतिकार करतात,' म्हणून तर शिवपुत्र छत्रपती राजाराम आपल्या राज्यापासून दूर जिंजीत असताना आणि त्यांच्या निधनानंतर महाराणी ताराराणीच्या काळात शूर, देशभक्त मराठा मावळ्यांनी पाव शतकाहून अधिक काळ ज्या एकात्म भावनेचं दर्शन घडवलं, ती धन्य होती आणि अनुकरणीय होती. आज फक्त भारतीय सेना दलात या पवित्र भावनेचं दर्शन घडतं. कवी प्रदीप म्हणूनच लिहितात,

कोइ सिख कोई जाट, मराठा। कोई गुरखा कोई मदरासी । सरहद्दपर लडनेवाला हर वीर था भारतवासी ॥ भारत-पाक युद्धात मरणोत्तर परमवीरचक्राचे मानकरी झालेल्या अब्दुल हमीद याने प्राणपणाने जो प्रतिकार केला, ती होती आपली राष्ट्रीय एकात्मता!

आज भारतीय एकात्मतेला जातिभेद, धर्मभेद, वंशभेद, प्रांतभेद, वर्गभेद, भाषाभेद अशा अनेक रोगांशी लढावं लागत आहे. भारत हा खूप मोठा देश आहे आणि भारताची लोकसंख्याही मोठी आहे. त्यातून आपण संसदीय लोकशाही ही शासन व्यवस्था स्वीकारली असून ती व्यक्तिस्वातंत्र्याची जपणूक करण्यासाठी कटिबद्ध आहे. घटनेनं खासगी मालमत्तेची मुभा दिली आहे. धार्मिकतेचं पालन करण्याचं स्वातंत्र्य दिलं आहे. आणि भारतीय स्वातंत्र्ययुद्धात सिद्ध झालेली सत्याग्रह आणि असहकारसारखी हत्यारं जनतेच्या हातात आज आहेत. शिक्षणाची संधी अनेकांना मिळते आहे. राजकारणाचं बाळकडू ज्या घराण्यांना लाभलं, तीही संख्येने खूप आहेत. घटनाकारांनी मागासवर्गीयांना राखीव जागांचा हक्क दिला, पण तो कोणी, कसा, कोठे, किती आणि केव्हापर्यंत वापरावा, हे सांगितलं नाही. लोकप्रतिनिधी राज्यघटनेने निर्माण केले, पण त्यांच्यावर नैतिक निर्बंध लादले नाहीत. हे सारं चित्र एका बाजूने राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने जेवढं चागलं आहे, तेवढंच ते दुसऱ्या बाजूने त्याहून कितीतरी पटीने अतिविद्रूप, कुरूप आणि बीभत्स असून एकात्मतेचा गळा घोटणारं, प्राणघातक आहे. हे स्वातंत्र्योत्तर काळात रग्गड अनुभवायला मिळालं आहे आणि भविष्यकाळासाठी तर ते फारच चिंताजनक बनणार आहे.

आज जातीय अभिनिवेश त्रासदायक होत आहे. धर्माभिमानी देशविघातक खेळ करताहेत. साधू-भोंदू, आयकर-संपत्तीकर चुकवणाऱ्या नट-नट्या, खेळाडू, करताहेत. प्रबळ नोकरशाही देशाची लूट करीत आहे. सत्तेला चटावलेले उद्योगपती, गुन्हेगार, संसदेत घुसून लोकशाहीची विटंबना नेते सत्तेसाठी मालमत्ता आणि मालमत्ता रक्षणार्थ सत्ता प्राप्त करीत आहेत. लोकसंख्येची वाढ, मद्योत्पादन आणि त्याचा अनिर्बंध वापर याविषयी कुणी नेता चुकूनही बोलत नाही. धार्मिकतेला संस्कृती मानण्याची घोडचूक करणारे आपण भविष्यकाळी धार्मिक कलहाचे बळी होणार, हे स्पष्ट दिसत आहे. पण त्यासाठी लोकशाहीकडे औषध नाही. लोकपालसारखं पद आमच्या भ्रष्ट नेत्यांना नको आहे, लोकशाहीच्या संवर्धनासाठी, हितरक्षणासाठी झटणाऱ्या न्यायव्यवस्थेला मदोन्मत्त राज्यकर्त्यांचे अत्याचार सहन करावे लागत आहेत. लबाड लोक स्वार्थासाठी सत्याग्रह, असहकार, उपोषण हे पवित्र मार्ग बेमुर्वतपणे वापरून गांधीजींचं सत्त्वहरण करीत आहेत. जगातील लोकशाहीनिष्ठ लोक भारताकडे आशाळभूतपणे पाहात आहेत. पण ही गरीब, अज्ञानी जनतेची फसवणूक आहे, हे त्यांना कळत नाही. म्हणूनच नव्वद टक्के गुलामांच्या या देशात राष्ट्रीय एकात्मता दिसत असली, तरी ती पुराणकथेहून वेगळी नाही. खरी राष्ट्रीय एकात्मता लांब कोठे तरी क्षितिजापलीकडे असेल. तिचा शोध घेण्यासाठीच दरवर्षी २० ऑक्टोबरला 'राष्ट्रीय एकात्मता दिन' साजरा करायचा का? कारण -

भारत मातेचे पुत्र । आम्ही धन्य ।
कर्तव्याची जाण । नाही आम्हा ॥ १
'घटना' रूपी अन्न । वाढूनिया दिले ।
ताट पळविले । कुत्र्यांनीच ॥ २
'घटना' रूपी वस्त्र । दिले अब्रूसाठी ।
लागे तिच्यापाठी । दुर्योधन ॥३
राज्यकर्ते पुत्र । मातेला छळती ।
तिला लाथाडती । येता जाता ।४
न्यायी पुत्र तिला । न्याय देऊ जाती ।
नेतेपुत्र येती । त्याच्या आड ॥५
जनतेचा शोक । भूक त्रास सारे।
अश्रूपूर्ण नेत्रे । पाही माता ॥ ६
एकतेचे स्वप्न । माता रोज पाही ।
उजाडता होई । स्वप्नभंग ॥७
तरी स्वप्न रोज । एकतेचे येते।
माता सुखी होते। फक्त तेव्हा ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

पान १ वरून

## ना.पाटील व आ. यशवंत मानें

पवार, अविनाश दादा मातंर्डे, प्रकाश चोरेकर, सुनील भोसले, सुवणार्ताई झाडे, प्रविण भालशंकर, दाजी गोफणे, भारतीय जनता पार्टी कोषाध्यक्ष इंद्रजीत पवार, मंजूर शेख, शिरीष म्हमाने, गणेश बचुटे, जगन्नाथ भोरे, अमोल पाटील,दशरथ पवार, श्रीकांत मातंर्डे, विशाल मातंर्डे, मनोहर विटकर सर, तायप्पा शेंडगे, रेवणसिद्ध कापसे, हणमंत बनसोडे, प्रदीप मुडके, चंद्रकांत तोडकर सह इतर उपस्थित होते.

पंढरपूर तालुक्यातील काही भागात ना.राजन पाटील, लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील व सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील मतदारांच्या गाटीभेटीवर भर देत आहेत.

# गणपती फार्मसीचा कृष्णा कॉलेज ऑफ फार्मसी कराड संघाविरुद्ध विजय

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** विद्यानिकेतन कॉलेज ऑफ फार्मसी, लाखेवाडी आयोजित राज्यस्तरीय थ्रोबॉल स्पर्धेत रोमांचक फेरीत कराडच्या कृष्णा फार्मसी कॉलेजचा पराभव करत गणपती फार्मसीने विजय मिळवला. राज्यभरातील 22 फार्मसी महाविद्यालयांचा सहभाग असलेल्या या स्पर्धेत तीव्र स्पर्धा आणि खिलाडूवृत्ती दिसून आली.

गणपती फार्मसीच्या संघाने संपूर्ण सामन्यात उल्लेखनीय कौशल्य आणि सांघिक कामगिरीचे प्रदर्शन केले आणि शेवटी त्यांच्या जबरदस्त प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध योग्य विजय मिळवला.



गणपती फार्मसीच्या प्राचार्या डॉ. रूपाली बेंदगुडे यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले आणि त्यांच्या समर्पण आणि कठोर परिश्रमाचे कौतुक केले.या स्पर्धेत आकांक्षा पाटील, दिपाली सुळे, साक्षी लोंढे, तृप्ती पाटील, पूजा कुलकर्णी, ज्ञानेश्वरी गेंद आणि साक्षी टोणपे यांनी सहभाग घेतला होता. सहभागी विद्यार्थिनींना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच संस्थेचे सचिव डॉ. आर. डी. बेंदगुडे, अध्यक्ष ॲड विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे, प्राचार्या डॉ. रुपाली बेंदगुडे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. महाविद्यालयातील या संघास प्रा. प्रियांका खडसरे, प्रा. रूपाली राऊत, प्रा.आशिष जाधव आणि प्रा. अक्षय भेंकी यांचे मार्गदर्शन लाभले.

# निर्मल हॉस्पिटल, मिरज येथे जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा

**मिरज (कटूसत्य वृत्त):-** निर्मल हॉस्पिटल, मिरज येथे जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गि.ग. कांबळे, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सांगली तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सांगली उपस्थित होते. कार्यक्रमात डॉ. शीतल शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिपक मुकादम सर यांनी केले.



या कार्यक्रमात माणिकराव सूर्यवंशी, मानसशास्त्र तज्ञ सांगली यांनी 'World Mental Health Day' या विषयावर मार्गदर्शनपर भाषण केले. तसेच, डॉ. दिपक मुकादम तसेच डॉ. शीतल शिंदे यांनीही मार्गदर्शनपर भाषण केले.

गि.ग.कांबळे यांनी अध्यक्षीय भाषणात रुग्णाच्या कायदेशीर अधिकारांच्या जागृतीवर भर दिला. तसेच, मानसिक आजारांबाबत जनजागृती करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. विशेषतः निर्मल हॉस्पिटल, मिरज सारख्या ठिकाणी अशा कार्यक्रमांचे आयोजन करून मानसिक आरोग्याबाबत लोकांना जागरूक करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमात निर्मल हॉस्पिटलद्वारे व्यसने व मानसिक रोग यावर जनजागृतीपर नाट्य सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार नितिन आंबेकर, सहायक विधी सेवा प्राधिकरण यांनी मानले यावेळी निर्मल हॉस्पिटल स्टाफ आणि मातोश्री हिराई देशमुख नर्सिंग कॉलेज , रेड शिराळा चे विद्यार्थी उपस्थित होते.

# सर्व नोडल अधिकारी यांनी निवडणूक कामकाजाची जबाबदारी अत्यंत दक्ष राहून पार पाडावी -जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 च्या अनुषंगाने जिल्हास्तरावर नियुक्त करण्यात आलेल्या सर्व संबंधित नोडल अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपवण्यात आलेली जबाबदारी अत्यंत दक्ष राहून पार पाडावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित सर्व नोडल अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. यावेळी निवासी उप जिल्हाधिकारी मनीषा कुंभार उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निराळी उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्यासह सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सर्व संबंधित निवडणूक नोडल अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विधानसभा



निवडणूक 2024 मध्ये अकरा मतदारसंघातील एकूण 3 हजार 723 मतदान केंद्रावर अत्यंत चांगल्या सोयीसुविधा मतदारांना उपलब्ध करून द्याव्यात. यासाठी नियुक्त केलेले नोडल अधिकारी यांनी ग्रामीण व शहरी भागात सर्व मतदान केंद्रावर सुविधा उपलब्ध करून घेण्याबाबतची कार्यवाही करावी. त्याप्रमाणे सर्व संबंधित अतिरिक्त निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्रिसायडिंग ऑफिसर च्या माध्यमातून प्रत्येक मतदान केंद्रावरील किमान दहा मतदारांना लोकसभा निवडणूक 2024 मध्ये मतदान केंद्रावर देण्यात आलेल्या सोयी सुविधा बाबत प्रश्न विचारून माहिती घ्यावी. तसेच या मतदान केंद्रावर निवडणूक कर्मचारी अधिकारी यांची वर्तणूक कशी होती याबाबत ही माहिती घ्यावी. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत प्रत्येक मतदान केंद्रावर आलेल्या सूचनेप्रमाणे अधिकच्या सुविधा उपलब्ध करणे सोयीचे होणार असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यातील एकूण मतदान केंद्रापैकी 50 टक्के मतदान केंद्रावर आयोगाच्या सूचनेप्रमाणे वेबकास्टिंग करण्यात येणार आहे. तरी वेब कास्टिंग करणाऱ्या महापालिकेच्या सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना अत्यंत सूक्ष्म प्रशिक्षण देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले. राजकीय पक्ष व उमेदवारांना जिल्हास्तरावरून देण्यात येणाऱ्या विविध परवानग्याच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या एक खिडकी योजनेअंतर्गत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी अत्यंत दक्ष राहून काम करावे व विहित वेळेत त्यांना परवानगी मिळतील याबाबत दक्षता घ्यावी असे त्यांनी सूचित केले. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात स्ट्रॉंग रूम निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे व्यवस्थित करण्यात आलेल्या आहेत का याबाबत खात्री करण्यासाठी 21 ऑक्टोबर रोजी अप्पर जिल्हाधिकारी चार विधानसभा मतदारसंघात, महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर तीन, तर आपण स्वतः चार विधानसभा मतदारसंघातील स्ट्रॉंग रूम ची पाहणी करणार असल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले. त्याप्रमाणेच सर्व निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे तंतोतंतपालन होण्यासाठी आयोगाने उपलब्ध करून दिलेले नियमावली पुस्तकांचे वाचन करावे, अशी सूचना त्यांनी केली.

## वात्रटिका

### हातघाईची लढाई

फॉर्म्युल्याची ओढाताण
तशीच चिरफाड आहे...
गल्लीतल्या वाटाघाटीची
दिल्ली दरबारी धाड आहे...
वाव युद्धात कोणाची
जोर लावून आघाडी आहे...
कोणाच्या तरी भांडणात
कोणाचीच उडी आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

